23 JAN 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अमोल बोंगार्डेची विजयी सलामी

## आंतरविद्यापीठ फ्रीस्टाइल कुस्ती : दिवसभरात ४८० कुस्त्या रंगल्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय मल्ल अमोल बोंगार्डे याने गुजरात विद्यापीठाच्या शाहेबाज खानला पराभूत करून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्रीस्टाइल कुस्ती स्पर्धेत रविवारी विजयी सलामी दिली. तर स्पर्धेस जल्लोषी उत्साहात सुरुवात झाली. दिवसभरात चार वजनगटात ४८० लढती रंगल्या.

विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात रविवारी सकाळी भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा निरीक्षक सुरेश मलिक, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे उपाध्यक्ष संभाजी वरूटे, शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन होऊन स्पर्धांना सुरुवात झाली. पहिल्या दिवशी ५७ किलो, ६५ किलो, ७४ किलो आणि ८६ किलो अशा चार वजनगटांमधील ४८० सामने रात्री उशिरापर्यंत रंगले. दरम्यान, या कुस्ती स्पर्धेसाठी देशातील १९५ विद्यापीठांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे देशभरातील २५६० मल्लांच्या चटकदार कुस्त्यांचा आनंद विद्यार्थ्यांसह कुस्ती शौकिनांना घेता येणार आहे.




शिवाजी विद्यापीठात रविवारपासून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्रीस्टाइल कुस्ती स्पर्धेस सुरुवात झाली. यामध्ये राष्ट्रीय मल्ल अमोल बोंगार्डे व गुजरात विद्यापीठाच्या शाहेबाज खान यांच्यात लढत झाली. (छाया : नसीर अत्तार)

फ्रीस्टाइल कुस्ती प्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या दहा मल्लांचा सहभाग आहे. सकाळच्या सत्रात शिवाजी विद्यापीठाअंतर्गत गगनबावडा येथील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयाचा पैलवान अमोल बाबूराव बोंगार्डे याने गुजरात विद्यापीठाच्या शाहेबाज खानला पराभूत करून पुढील फेरीत प्रवेश केला. तर आज, सोमवारी अनेक नामांकित मल्लांच्या कुस्ती पाहण्याची संधी विद्यार्थ्यांसह कुस्ती शौकिनांना मिळणार आहे. दरम्यान स्पर्धास्थळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांनी भेट देऊन पाहणी केली.

जनसंपर्क कक्ष

22 JAN 2023 महासत्ता शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ व गोशिमा सबक्लस्टर यांच्यात सामंजस्य करार

कोल्हापूर, ता.२१(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठ व गोशिमा सबक्लस्टर यांच्यामध्ये प्रशिक्षण, कौशल्य विकास आणि संशोधन या क्षेत्रात एकत्र काम करण्याच्या दृष्टीने सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारांतर्गत विद्यार्थी केंद्रित प्रशिक्षण व कौशल्य आधारित अभ्यासक्रम, उद्योगाशी निगडित कार्यशाळा, उद्योग समस्या निर्गमित करण्याकरिता विविध संशोधन प्रकल्प इत्यादी उपक्रम हाती घेण्याचे आयोजन केले आहे.

यावेळी कुलगुरु प्रा. डी. टी. शिर्के यांनी हा सामंजस्य करार विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी अतिशय महत्वाचा असून त्या अंतर्गत विद्यार्थी व शिक्षक हे तांत्रिक व उद्योगाशी निगडित नवनवीन ज्ञान निश्चितच अवगत करतील, असा ठाम विश्वास व्यक्त केला.

प्र-कुलगुरु प्रा. पी.एस.पाटील यांनी या सामंजस्य करार अंतर्गत उद्योजकांनी विद्यापीठातील अत्याधुनिक उपकरणांचा वापर करून त्यांनी उत्पादनांची गुणवत्ता वाढवावी, तसेच प्रशिक्षकांना प्रशिक्षित करण्यासाठी या करारअंतर्गत विशेष प्रशिक्षण शिबिरे आयोजित करावेत, असे सुचविले. सचिन शिरगावकर (अध्यक्ष, आय. आय. एफ.) यांनी गोशिमा सेंटर ऑफ एक्सलन्स मध्ये सुरु असलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.

मोहन पंडितराव यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. (डॉ.)एस.डी.डेळेकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव प्रा. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.


या कार्यक्रमास प्रा. एस. एच. ठकार, प्रा.पी. डी. राऊत, प्रा. के.डी.सोनवणे, अजित आजरी, रणजित मोरे, अमोल यादव, विजय वसगडे, श्रीनिवास जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

23 JAN 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अमोल बोंगार्डेची विजयी सलामी

## अ. भा. आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेस दिमाखात प्रारंभ




**कोल्हापूर : अ.भा. आंतरविद्यापीठ फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा कुस्तीपटू अमोल बोंगार्डे (लाल जर्सी) याने कुरुक्षेत्र विद्यापीठाचा शुभम (निळी जर्सी) याच्यावर कब्जा मिळविला तो क्षण. (छाया : पप्पू अत्तार)**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवछत्रपती, राजर्षी शाहू महाराज व बजरंगबलीचा जयघोष, रणहलगी-तुतारीचा दणदणाट आणि शड्डूचा आवाज अशा रांगड्या वातावरणात रविवारी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेस दिमाखात प्रारंभ झाला. यात अमोल बोंगार्डेने विजयी सलामी दिली.

शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊ सभागृहात सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील पुरुषांच्या अ.भा. फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेची जल्लोषात सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी ५७ किलो, ६५ किलो, ७४ किलो आणि ८६ किलो अशा चार वजनी गटांत तब्बल ४८० सामने रंगले. फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या १० खेळाडूंचा सहभाग आहे. सकाळच्या सत्रात गगनबावडा येथील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयाचा पै. अमोल बोंगार्डे याने गुजरात विद्यापीठाच्या शाहबाज खानला पराभूत करून पुढील फेरीत प्रवेश केला.

आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा निरीक्षक सुरेश मलिक, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे उपाध्यक्ष संभाजी वरूटे, शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक तथा माजी क्रीडा विभागप्रमुख डॉ. प्रकाश गायकवाड यांच्या उपस्थितीत ध्वजवंदनाने स्पर्धेची सुरुवात झाली. दरम्यान, सकाळच्या सत्रात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्पर्धास्थळास भेट देऊन पाहणी करून स्पर्धा सुरळीत होण्याच्या अनुषंगाने विशेष सूचना केल्या.

या कुस्ती स्पर्धेसाठी देशातील १९५ विद्यापीठांनी नोंदणी करून सहभाग दर्शविला आहे. आठवडाभरात देशभरातील २५६० बलदंड आणि चपळ पैलवान कुस्तीतील स्वतःचे कसब दाखवण्यासाठी व सिद्ध करण्यासाठी सज्ज झाले आहेत. स्पर्धेचे संयोजन संचालक दिलीप पवार, तांत्रिक संचालक बंकट यादव, नवनाथ ढमाळ व सहकारी करत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JAN 2023 पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धांना प्रारंभ

## चार वजनी गटांत रंगले ४८० सामने, देशभरातून १९५ संघांचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्री स्टाईल कुस्ती (पुरुष) स्पर्धांना जल्लोषात सुरुवात झाली. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी चार वजनी गटांमधील ४८० सामने रंगले. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात स्पर्धा निरीक्षक सुरेश मलिक, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे उपाध्यक्ष संभाजी वरूटे, शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश गायकवाड यांच्या उपस्थितीत ध्वजवंदन होऊन स्पर्धांना सुरुवात झाली.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि प्रभारी



कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सकाळच्या सत्रात स्पर्धास्थळास भेट देऊन पाहणी केली. सकाळी सहा वाजल्यापासूनच दाखल झालेल्या कुस्तीपटूंची वजने घेण्यात आली. दिवसभरात चार मॅटवर ५७ किलो वजनी गटात १२२, ६५ किलोमध्ये १२७, ७४ किलो गटात ११५ आणि ८६ किलो वजनी गटात ११६ असे एकूण ४८० सामने झाले. सामने रात्री उशिरापर्यंत सुरू होते.

सध्या सुरू असलेल्या फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या दहा खेळाडूंचा सहभाग आहे. गगनबावडा येथील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयाचा अमोल बाबूराव बोंगार्डे याने गुजरात विद्यापीठाच्या शाहेबाज खानला पराभूत करून पुढील फेरीत प्रवेश केला. दरम्यान, या कुस्ती स्पर्धेसाठी देशातील १९५ विद्यापीठांनी नोंदणी करून सहभाग दर्शवला आहे.

स्पर्धा संचालक दिलीप पवार, तांत्रिक संचालक बंकट यादव, आंतरराष्ट्रीय रेफ्री नवनाथ ढमाळ यांच्या देखरेखीखाली स्पर्धा होत आहे.

जनसंपर्क कक्ष
23 JAN 2023 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शरीरसौष्ठव स्पर्धेत ओंकार पाडळकरला सुवर्ण

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

येथील शिवराज महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरविद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेत ७५ ते ८० किलो वजनी गटात शिवराज महाविद्यालयाचा ओंकार पाडळकर सुवर्णपदक विजेता ठरला. स्वागत व प्रास्ताविक क्रीडा विभागप्रमुख डॉ. राहुल मगदूम यांनी केले. स्पर्धेचे उद्घाटन शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेत विविध महाविद्यालयातील नव्वद खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतून ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटीसाठी खेळाडूंची निवड करण्यात आली.

वजन गटनिहाय अनुक्रमे विजेते असे, ६० किलो-अवधूत निगडे (आसुर्ले-पार्ले कॉलेज), रोशन वेदांते (जी.के.जी कॉलेज), विनायक शिंडकर (एन. पाटील कॉलेज, सांगली), ६०-६५ किलो-विशाल पाटील (विठ्ठलराव पाटील कॉलेज, कळे), अनिल मोहनगेकर (कोवाड महाविद्यालय), अनिकेत दाते (एस.बी.एस., कराड), ६५-७० किलो-अर्जुन मोंगले (डांगे कॉलेज, हातकणगंले), ऋषाल पोवार (कॉमर्स कॉलेज), ओमकार भांडेगरी (दूधसाखर, बिद्री), ७०-७५ किलो- रोहित भोगण (कोवाड कॉलेज), प्रणव कांबळे (शहाजी कॉलेज), ओम पाटील (एन.डी.पी.एन., सांगली), ७५-८० किलो- ओमकार पाडळकर (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज), अमन कुटे (एस.व्ही.एम., इचलकरंजी), वरदराज पाटील (डी.एस.सी., कराड), ८०-८५ किलो- सुमित सुतार (साधना कॉमर्स, गडहिंग्लज), मनीष सुतार (एन.डी. पाटील कॉलेज, सांगली), आशीष पाटील (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज), ८५-९० किलो- प्रशांत भोसले (विवेकानंद कॉलेज), विजय शिंडकर (एन.डी.पी.एन.), प्रसाद कुंभार (शिवाजी विद्यापीठ), ९० किलो- युवराज खोत (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज), पृथ्वीराज उनाळे (डी.वाय.पी. कॉलेज, साळोखेनगर).

सकाळ



कोल्हापूर : आंतरविद्यापीठ फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेत कोल्हापूरचा अमोल बोंगार्डे (लाल जर्सी) आणि कुरुक्षेत्र विद्यापीठाचा शुभम यांच्यात कुस्ती रंगली.

# चटकदार कुस्त्यांनी रंगला पहिला दिवस

## आंतरविद्यापीठ फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धा; आज उद्‌घाटन

कोल्हापूर, ता. २२ : विविध गटांतील चटकदार कुस्त्यांनी शिवाजी विद्यापीठातील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फ्रीस्टाईल कुस्ती (पुरुष) स्पर्धेचा पहिला दिवस रंगला. रविवारी दिवसभरात ५७, ६५, ७४ आणि ८६ किलो अशा चार वजनी गटांमधील ४८० सामने झाले. दरम्यान, या स्पर्धेचे उद्‌घाटन सोमवारी (ता. २३) दुपारी चार वाजता श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, हिंदकेसरी दीनानाथसिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सकाळी भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा निरीक्षक सुरेश मलिक, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे उपाध्यक्ष संभाजी वरुटे, शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजवंदन होऊन स्पर्धा सुरू झाली. सकाळी सहा वाजल्यापासूनच दाखल झालेल्या कुस्तीपटूंची वजने घेण्यात आली. त्यानंतर सकाळी नऊच्या सुमारास स्पर्धांना प्रत्यक्ष सुरुवात झाली. दिवसभरात चार मॅटवर ५७ किलो वजनी गटात १२२, तर ६५ किलोमध्ये १२७ व ७४ किलो गटांत ११५ आणि ८६ किलो वजनी गटांत ११६, असे एकूण ४८० सामने झाले. त्यातील विजेत्या मल्लांनी पुढील फेरीत प्रवेश केला. सामने रात्री उशिरापर्यंत सुरू राहिले.

या स्पर्धेसाठी देशातील १९५ विद्यापीठांनी नोंदणी केली आहे. येत्या आठवडाभरात देशभरातील २५६० बलदंड आणि चपळ पैलवान कुस्तीतील स्वतःचे कसब दाखवण्यासह आणि सिद्ध करण्यासाठी सज्ज झाले आहेत. स्पर्धा संचालक दिलीप पवार, तांत्रिक संचालक बंकट यादव, आंतरराष्ट्रीय रेफ्री नवनाथ ढमाळ यांच्या देखरेखीखाली स्पर्धा नियोजन समितीचे कामकाज सुरू आहे.

### गगनबावड्याचा अमोल बोंगार्डे पुढील फेरीत

■ या फ्रीस्टाईल कुस्ती प्रकारात शिवाजी विद्यापीठाच्या दहा खेळाडूंचा सहभाग आहे. सकाळच्या सत्रात रविवारी शिवाजी विद्यापीठांतर्गत गगनबावडा येथील पैलवान अमोल बोंगार्डे याने गुजरात विद्यापीठाच्या शाहेबाज खानला पराभूत करून पुढील फेरीत प्रवेश केला.

### कुलगुरूंनी केली पाहणी

■ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सकाळच्या सत्रात स्पर्धास्थळास भेट देऊन पाहणी केली. क्रीडा संचालकांसह स्पर्धा निरीक्षकांची भेट घेऊन स्पर्धा सुरळीत होण्याच्यादृष्टीने काही सूचना केल्या.

जनसंपर्क कक्ष
23 JAN 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिवराज'च्या पाडळकरला सुवर्णपदक

## विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ९० खेळाडूंचा सहभाग

**गडहिंग्लज, ता. २२ :** येथील शिवराज महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या आंतरविद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेत ७५ ते ८० किलो वजन गटात शिवराज महाविद्यालयाचा ओंकार पाडळकर सुवर्णपदक विजेता ठरला. या स्पर्धेत विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ९० खेळाडूंचा सहभाग होता. या स्पर्धेतून ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड करण्यात आली.

### आंतरविद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धा



**गडहिंग्लज : आंतरविद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेतील विजेत्यांना गौरविताना प्रा. किसनराव कुराडे, प्रा. अशोक मोरमारे, डॉ. राहुल मगदूम आदी.**

'शिवराज'चे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. 'शरीरसौष्ठव'चे ज्येष्ठ पंच प्रा. के. बी. केसरकर, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे, प्रा. विश्वजित कुराडे, संजय धुरे, भारतश्री अजिंक्य रेडेकर, विजय मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. कुराडे, प्रा. केसरकर यांची भाषणे झाली. डॉ. राहुल मगदूम यांनी स्वागत केले, विद्यापीठ निवड समितीचे डॉ. प्रशांत पाटील, प्रा. रवी चव्हाण, प्रा. विक्रम यमगेकर, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम उपस्थित होते. प्रा. अशोक मोरमारे यांनी सूत्रसंचालन केले. रवींद्र आरते, रामचंद्र चितळे, विवेक संकपाळ, विजय मोरे, राहुल परीट, राजेश वडाम, दीपक माने, सचिन चांदेकर, ओम सातपुते, संदीप यादव, रवी चौगुले यांनी पंच म्हणून काम पाहिले. वजन गटनिहाय निकाल असा : ६० किलो- अवधूत निगडे (आसुर्ले-पोर्ले), रोशन वेदांते- जी. के. जी. (कोल्हापूर), विनायक शिंडकर- पाटील महाविद्यालय (सांगली), ६०-६५ किलो : विशाल पाटील वि. पाटील महाविद्यालय (कळे), अनिल मोहनगेकर-कोवाड महाविद्यालय, अनिकेत दाते- एस. बी. एस. (कऱ्हाड), ६५-७० किलो : अर्जुन मोंगले- डांगे (हातकणंगले), रुषाल पोवार कॉमर्स कॉलेज (कोल्हापूर), ओंकार भांडेगरी- दूधसाखर (बिद्री), ७०-७५ किलो : रोहित भोगण- कोवाड महाविद्यालय, प्रणव कांबळे- शहाजी (कोल्हापूर), ओम पाटील- एन.डी. पी.एन. (सांगली), ७५-८० किलो : ओंकार पाडळकर- शिवराज (गडहिंग्लज), अमन कुटे- एस.व्ही. एम. (इचलकरंजी), वरदराज पाटील- डी.एस.सी.(कऱ्हाड), ८०-८५ किलो : सुमीत सुतार- साधना (गडहिंग्लज), मनीष सुतार- एन. डी. पाटील (सांगली), आशिष पाटील- शिवराज (गडहिंग्लज), ८५-९० किलो : प्रशांत भोसले- विवेकानंद (कोल्हापूर), विजय शिंडकर- एन.डी.पी.एन. (सांगली), प्रसाद कुंभार- शिवाजी विद्यापीठ, ९० किलो : युवराज खोत-शिवराज (गडहिंग्लज), पृथ्वीराज उनाळे- डी.वाय.पी. साळोखेनगर. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. प्रा. जयवंत पाटील यांनी आभार मानले.

23 JAN 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शिवाजी विद्यापीठाच्या अमोलचा गुजरातच्या शाहेबाजवर विजय

## अ. भा. आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेला प्रारंभ : दिवसभरात ४८० कुस्तींमधील मल्लांच्या शड्डूने घुमले विद्यापीठ : आज दुपारी ४ वाजता उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशातील तब्बल १९५ विद्यापीठांमधील २५६० मल्लांचा सहभागाने भव्य स्वरुप धारण केलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती (पुरूष) स्पर्धेला रविवारी शिवाजी विद्यापीठात प्रारंभ झाला. या स्पर्धेसाठी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात अत्याधुनिक अशा चार मॅटची मैदाने बनवली आहेत. या मॅटवर दिवसभरात ५७, ६५, ७४ आणि ८६ किलो अशा चार वजनी गटांत फ्रिस्टाईल प्रकाराच्या ४८० कुस्ती घेण्यात आल्या. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघातून स्पर्धेत उतरलेला मल्ल अमोल बाबुराव बोंगार्डेने गुजरात विद्यापीठाच्या शाहेबाज खानला सहज पराभूत करून पुढील फेरीत प्रवेश केला. अमोल हा गगनबावडा येथील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयाचा मल्ल आहे.

दरम्यान, या स्पर्धेचे सोमवार २३ रोजी दुपारी ४ वाजता उद्घाटन केले जाणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून श्रीमंत शाहू छत्रपती हे उपस्थित राहणार आहेत. शिवाजी विद्यापीठाने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत फ्रीस्टाईल कुस्ती प्रकारातून शिवाजी विद्यापीठाचे दहा मल्ल सहभागी झाले आहेत. ऐकोणतीस जानेवारीपर्यंत सुरु राहणाऱ्या या स्पर्धेच्या प्रारंभी जिजाऊ सभागृहात ध्वजवंदन केले. यावेळी




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरु झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती (पुरूष) स्पर्धेअंतर्गत शिवाजी विद्यापीठाचा अमोल बोंगाडे व कुरुक्षेत्र विद्यापीठाचा शुभम या मल्लांमध्ये झालेल्या कुस्तीतील एक संघर्षमय क्षण.**

स्पर्धेचे निरीक्षक सुरेश मलिक, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे उपाध्यक्ष संभाजी वरुटे, शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक तथा माजी क्रीडा विभागप्रमुख डॉ. प्रकाश गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, सकाळी सहा वाजता स्पर्धेतील मल्लांची वजने घेऊन त्यांच्याकडील स्पर्धेसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची छाननी केली. त्यानंतर नऊ वाजता प्रत्यक्ष कुस्तींना सुरवात केली.

दिवसभरात स्पर्धेसाठी तयार केलेल्या चार मॅटवर ५७ किलो वजनी गटातील १२२ तर ६५ किलो वजनी गटातील १२७ कुस्ती लावण्यात आल्या. तसेच ७४ किलो वजनी गटात ११५ आणि ८६ किलो वजनी गटात ११६ कुस्ती झाल्या. स्पर्धा संचालक दिलीप पवार, तांत्रिक संचालक बंकट यादव, आंतरराष्ट्रीय पंच नवनाथ ढमाळ यांच्यासह स्पर्धा नियोजन समितीच्या देखरेखीखाली या सर्व कुस्ती घेण्यात आल्या. सकाळपासून रात्री उशीरापर्यंत सुरू लागोपाठ सुरु राहिलेल्या या कुस्ती पाहण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील आजी–माजी मल्लांनी विद्यापीठात हजेरी लावली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील व प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्पर्धेला भेट देऊन क्रीडा संचालक व स्पर्धा निरीक्षकांना स्पर्धेच्या अनुषंगाने सूचना केल्या.

जनसंपर्क कक्ष
23 JAN 2023
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# देशभरातील ६७०० संशोधकांना नवी दिशा

## डीएसटी रिसर्च अँड डेव्हलपमेंटप्रमुख डॉ. प्रतिष्ठा पांडे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या स्तुती उपक्रमांतर्गत संशोधकांना त्यांचे सँपल तपासण्याची संधी मिळाली. या स्तुती उपक्रमाचा फायदा देशभरातील ६७०० संशोधकांना झाला, ही अभिमानास्पद गोष्ट आहे, असे प्रतिपादन केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट विभागप्रमुख डॉ. प्रतिष्ठा पांडे यांनी केले.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित आणि शिवाजी विद्यापीठ व संत गाडगेबाबा अमरावती



कोल्हापूर : अमरावती विद्यापीठ सीआयएफ संचालक डॉ. पी. ए. गरांडे, वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख प्रा. वर्षा नाथर, स्तुति समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. चारू मायी.

विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने स्तुति प्रशिक्षण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. सी. डी. मायी व शिवाजी विद्यापीठातील स्तुतिचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांची प्रमुख्य उपस्थिती होती.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील प्रशिक्षण कार्यक्रमात तज्ज्ञ प्राध्यापकांनी प्रगतशील उपकरणावर तांत्रिक बाबीची माहिती दिली. स्तुति प्रशिक्षण कार्यक्रमात मराठवाडा कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सी. डी. मायी, डॉ. आर. जी. सोनकवडे, डॉ. व्ही. एस. चौबे, डॉ. व्ही. एन. नाथर, डॉ. टी. आर. देशमुख यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमात ऑनलाईन लोक सहभागी झाले होते. या उपक्रमातून संशोधकांना नवीन दिशा मिळाली असून देशभरातील केवळ १३ पीएमयू संस्थांनी करून दाखवले आहे. आपल्याकडे असणाऱ्या अनेक प्रतिभावान संशोधक आणि त्यांचे संशोधन हे एकत्ररित्या मांडले गेले पाहिजेत.